(8)

अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका,
जा.क्र :- अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/८३७६
दिनांक :- १८/०१/२०२१

-: कार्यालयीन आदेश :-

विषय : पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा विकसित करणेकामी समन्वय अधिकारी यांचे अखत्यारित कक्षाचे कामकाजाकरिता अधिकारी / कर्मचारी यांचे नेमणूकीबाबत

संदर्भ : आदेश जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था/५९२९, दि.२७/११/२०२०

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा विकसित करणेकामी समन्वय अधिकारी म्हणून संदर्भांकिंत आदेशान्वये नियुक्ती करणेत आलेली आहे.

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांचे विकसन होण्याच्या दृष्टीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र व पुणे महानगरपालिका यांचे मार्फत संयुक्त कार्यवाही करणेचे कामी समन्वय राखणे, या जागांच्या विकसनासाठी धोरण ठरविणे, सदर जागा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मार्फत विकसित करणेकामी पुणे मनपातील विविध विभागांशी समन्वय ठेवणे, तसेच त्या जागा विकसित करणेच्या दृष्टीने सर्व ती कार्यवाही करणे या कामकाजासाठी कक्ष स्थापन करण्यात येत आहे.

सदर कक्षाचे कामकाजासाठी श्रीमती वनश्री लाभशेटवार, उप आयुक्त (भूसंपादन व व्यवस्थापन) तथा समन्वय अधिकारी यांचे अखत्यारित खालील सेवकांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| क्र. | सेवकांचे नाव व हुद्दा | सध्याचे खाते |
|---|---|---|
| १. | श्री. दुदुसकर शंकर चंद्रकात,<br>उप अभियंता (स्थापत्य) | अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग |
| २. | श्री. शेखर वसंत काटे,<br>शाखा अभियंता (स्थापत्य) | उद्यान विभाग |
| ३. | श्री. शहाणे सचिन सुभाष<br>लिपिक टंकलेखक | चाळ विभाग |

उपरोक्त अधिकारी/कर्मचारी यांनी स्वत:चे कामकाज सांभाळून सदर कक्षाचे अतिरिक्त कामकाज करावयाचे आहे.

उपरोक्त अधिकारी/ कर्मचारी यांनी आपला रुजू अहवाल उप आयुक्त, भूसंपादन व व्यवस्थापन तथा समन्वय अधिकारी यांचे मार्फत सादर करावा.

Rubal 13/1/2021

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

Z:\Projects\Office Order_Slum Rehabilation.docx-2